**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

# प्रेस नोट

**दिनांक ०१/०७/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

## घरफोडी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील मौजा कवठा शिवार येथे फिर्यादी नामे— मोहन शंकरराव वाईनदेशनकर, वय ४३ वर्ष, रा. फैलपुरा काटोल, ह.मु. रत्ना सायनतारा हजारी पहाड नागपूर हे दिनांक २८/०६/२०२२ रोजी दुपारी ०२.०० वा. नागपुर वरून आपले घरी फैलपुरा काटोल येथे जात असतांना त्याचा मित्र रमेश सवल रा. काटोल यांचे कडे थांबुन डॉयव्हर अरूण परतेकी याला घरी पाठवले असता त्याने घराचे दार उघडले तेव्हा घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. त्याने फिर्यादीला फोन करून सांगितले की, 'घरातील समान अस्ताव्यस्त करून घरातील हॉल मधील खिडकी उघडी दिसली व कपाटातील सामान अस्ताव्यस्त दिसले. दिनांक २८/०६/२२ चे १९.०० वा. ते ३०/०६/२२ चे २३.२६ वा. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घरातील खिडकी मधुन घरात प्रवेश करून घरामध्ये असलेली लोखंडी तिजोरीतील पुजेचे ठेवलेले पैसे नगदी ३६००/—रूपये पुजेतील चांदीचे २३ नाणे वजन १५० ग्रॅम किंमती १०,०००/—रू. पुजेतील सोण्याचे नाणे एक ग्रॅम प्रमाणे ७ नग, ७ ग्रॅम किंमती २१,०००/—रू. असा एकुंण कि. ३४,६००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोजिस उपनिरीक्षक निभोरकर पो.स्टे. काटोल ९५२७३४७४४३ हे करीत आहे.

## जबर दुखापत

**पो.स्टे. नरखेड** :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील खामली येथे दिनांक २९/०६/२०२२ चे १८.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— साहेबराव कृष्णाजी धूर्वे वय ५९ वर्ष रा. खामली ता. नरखेड व आरोपी नामे— निलेश साहेबराव धूर्वे  रा खामली ता. नरखेड हे वडील मुलगा असून आरोपी मुलगा हा मोटरसायकल घेवून जात असतांना 'तु मोटरसायकल घेवून कोठे जात आहे?' असे विचारले असता त्याने म्हटले की, 'मी कुठेही जाणार' त्यावर फिर्यादीने म्हटले की, 'लोकांना दारु पिण्यासाठी गाडी नाही' असे म्हटले असता आरोपीने फिर्यादीला काडीने डाव्या खांदयाला व डाव्या हाताच्या दंडावर मारुन जखमी केले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३२५ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा धनराज भुक्ते मो.क्र. ९८२३६१२८५८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**